# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः11.12.2024** **वारःबुधवार**

---

1. नागरिकांचे हक्क आणि प्रतिष्ठा जपण्याच्या दृष्टीनं देशात समान डिजिटल वातावरण तयार होणं आवश्यक असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं प्रतिपादन
2. सातव्या स्मार्ट इंडिया हॅकेथॉनच्या अंतिम फेरीत सहभागी विद्यार्थ्यांशी पंतप्रधान नरेंद्र मोदी, आज साधणार संवाद
3. पुणे पुस्तक महोत्सवाच्या अनुषंगाने आज, 'शांतता-पुणेकर वाचत आहेत' या उपक्रमाचं आयोजन
4. माजी परराष्ट्र मंत्री आणि महाराष्ट्राचे माजी राज्यपाल एस. एम. कृष्णा यांच्या निधनाबद्दल मान्यवरांकडून शोक व्यक्त आणि
5. मुंबईत बेस्ट बस अपघातातल्या मृतांची संख्या 7, मृतांच्या कुटुंबांना राज्य सरकारकडून प्रत्येकी 5 लाख रुपयांची मदत जाहीर

**<u>राष्ट्रपती</u>**

नागरिकांचे हक्क आणि प्रतिष्ठा जपण्याच्या दृष्टीनं देशात समान डिजिटल वातावरण तयार होणं आवश्यक आहे असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं. आंतरराष्टीय मानवाधिकार दिवसानिमित्त नवी दिल्लीत विज्ञान भवन इथं आयोजित कार्यक्रमात त्या काल बोलत बोलत होत्या. मानवाधिकारांचं रक्षण करताना सायबर गुन्हे आणि हवामान बदल यासारख्या मोठ्या आव्हानांवर मात करणं आवश्यक आहे. गरिबी निर्मूलन, भूक निर्मूलन, तसंच तरुणांना समान संधी देणारी धोरणं राबवून भारतानं जगासमोर एक आदर्श उदाहरण घालून दिलं आहे, असं राष्ट्रपती म्हणाल्या.

**<u>राज्यपाल-मुंबई</u>**

मुंबई राजभवनात राज्यपाल सी.पी राधाकृष्णन यांच्या उपस्थितीत आंतरराष्ट्रीय मानवाधिकार दिनाच्या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी निवृत्त न्यायाधीश एन.एच पाटील, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाचे अध्यक्ष के.के. तातेड, यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. प्रत्येक व्यक्तीच्या हक्कांचं रक्षण झालं तरच आपली लोकशाही बळकट होते, असं प्रतिपादन राज्यपालांनी यावेळी केलं. या कार्यक्रमात राज्य मानवाधिकार आयोगाच्या स्मरणिकेचं प्रकाशन झालं. विविध दुर्लक्षित समाजघटकांच्या अधिकारांवर प्रकाश टाकणारी, सात मान्यवरांची सत्रंही या कार्यक्रमात झाली. तसंच महात्मा गांधींच्या 11 शपथांवर आधारित प्रदर्शन, तसंच मानवाधिकारांशी संबंधित विविध विषयांवरची दालनंही यावेळी लावण्यात आली होती.

**<u>स्मार्ट इंडिया हॅकेथॉन</u>**

सातव्या स्मार्ट इंडिया हॅकेथॉनची अंतिम फेरी आजपासून देशभरातल्या 51 केंद्रांवर सुरू होत आहे. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या हस्ते दूरस्थ माध्यमातून त्याचं उद्घाटन होईल. या स्पर्धेत सहभागी होत असलेल्या विद्यार्थ्यांशी पंतप्रधान नरेंद्र मोदी आज दूरस्थ माध्यमातून संवाद साधणार आहेत. या स्पर्धेत 13शे हून अधिक विद्यार्थी संघ सहभागी होत आहेत. राज्यात मुंबई, पुणे, नागपूर आणि कोल्हापूर या चार ठिकाणी ही अंतिम फेरी पार

पडणार आहे. पुण्याच्या एमआयटी विद्यापीठामध्ये स्मार्ट इंडिया हॅकेथॉन स्पर्धेच्या हार्डवेअर गटाची अंतिम फेरी होणार आहे. येत्या 15 डिसेंबरपर्यंत ही महाअंतिम फेरी चालेल.

**संसद**

संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये कालही विविध मुद्द्यांवरून झालेल्या गदारोळामुळे कामकाज आधी दोनदा आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. सभागृहाच्या मर्यादेचं पालन करण्याचं आवाहन त्यांनी सदस्यांना केलं. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनीही चर्चेच्या माध्यमातून संसदेचं कामकाज चालवण्याचं आवाहन सदस्यांना केलं आहे. दरम्यान राज्यसभा अध्यक्ष जगदीप धनखड यांच्याविरुद्ध काँग्रेसप्रणित विरोधी आघाडीने अविश्वास प्रस्ताव मांडला आहे. विरोधी पक्षांच्या सदस्यांना सभागृहात बोलण्याची संधी नाकारुन अध्यक्ष पक्षपात करत असल्याने हा प्रस्ताव मांडल्याचं काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी म्हटलं आहे. तर सत्ताधारी पक्ष राज्यसभा अध्यक्षांच्या पाठीशी खंबीर उभा असल्याचं संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी सांगितलं.

**इव्हीएम**

विधानसभा निवडणुकीत व्हिव्हीपॅट पडताळणीबाबत सर्व प्रक्रियेचं तंतोतंत पालन केल्याचं, निवडणूक आयोगानं स्पष्ट केलं आहे. 23 नोव्हेंबरला 288 मतदारसंघातल्या 1 हजार 440 व्हिव्हीपॅट युनिटची मोजणी केली असता, चिठ्ठ्या आणि मतदान यंत्रात नोंद झालेली मतं, यामध्ये कुठलीही तफावत आढळून आली नाही, असं आयोगानं जारी केलेल्या पत्रकात स्पष्ट करण्यात आलं आहे.

दरम्यान, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांवर बंदी घालून यापुढे सगळ्या निवडणुका मतपत्रिकेद्वारे घेण्याच्या मागणीसाठी काल राज्यात विविध ठिकाणी काँग्रेस पक्षानं स्वाक्षरी मोहीम सुरू केली. तर सोलापूर जिल्ह्यातील मारकवाडी इथं भाजपा आमदार गोपीचंद पडळकर आणि आमदार सदाभाऊ खोत यांच्या उपस्थितीत इव्हीएम मशीनची मिरवणूक काढण्यात आली.

**पुणे पुस्तक महोत्सव**

पुणे पुस्तक महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आज दुपारी 12 ते 1 या वेळेत 'शांतता... पुणेकर वाचत आहेत' हा उपक्रम घेण्यात येणार आहे. या उपक्रमात महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी, शाळा महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक सहभागी होणार आहेत. हा उपक्रम सार्वजनिक वाचनालय, ग्रंथालये, पुणे विमानतळ, मेट्रो स्थानक, पीएमपीएमएल बसस्थानक, रिक्षा थांब्यांवरही होणार आहे. या उपक्रमात पुणेकरांनी मोठ्या संख्येनं सहभागी व्हावं असं आवाहन आयोजकांनी केलं आहे.

**पादचारी दिन**

पुणे महापालिकेतर्फे आज लक्ष्मी रस्त्यावर पादचारी दिन साजरा करण्यात येणार आहे. पादचाऱ्यांची सुरक्षा आणि त्यांच्या अधिकारांबबत जागृती करण्यासाठी गेल्या चार वर्षांपासून हा उपक्रम आयोजित केला जातो. या उपक्रमाविषयी अधिक माहिती देताना वाहतूक नियोजन अधिकारी निखिल मिजार म्हणाले....

**पादचारी दिन**

पादचारी दिनाच्या पार्श्वभूमीवर पुणे शहर पोलिसांनी लक्ष्मी रस्त्यावरील वाहतूक अन्य मार्गाने वळवली आहे. सकाळी 8 ते रात्री 8 वाजेपर्यंत वाहतुकीतील बदल लागू असतील. नागरिकांनी आणि वाहनचालकांनी या बदलांची माहिती घेऊन त्यानुसार प्रवासाचं नियोजन करावं, असं आवाहन वाहतूक पोलिसांनी केलं आहे.

**चिपळूण वाचन मंदिर**

चिपळूणच्या लोकमान्य टिळक स्मारक वाचनमंदिराच्या संग्रहालयाचं 2021 च्या महापुरात मोठं नुकसान झालं. त्याची पुन्हा उभारणी केली जात असून, रत्नागिरी जिल्ह्याच्या शिक्षण क्षेत्रात महत्त्वपूर्ण कार्य केलेल्या दिवंगत रामभाऊ साठे यांचं नाव त्याला दिलं जाणार आहे. त्याविषयीचा हा वृत्तांत...

**कोकणाची सांस्कृतिक राजधानी अशी ओळख असलेल्या चिपळूणमधली 160 वर्षांची संस्था म्हणजे लोकमान्य टिळक स्मारक वाचनमंदिर. अनेक महत्त्वाचे साहित्यिक-सांस्कृतिक उपक्रम राबवत असलेल्या या संस्थेचं वस्तुसंग्रहालयही वैशिष्ट्यपूर्ण होतं; मात्र 2021च्या महापुरात त्याचं मोठं नुकसान झालं. ते आता पुन्हा एकदा जोमाने उभारलं जात आहे. शिक्षणक्षेत्रात बहुमुल्य योगदान देणारे रामभाऊ साठे यांचं नाव संग्रहालयाला दिलं जाणार आहे. त्यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या औचित्याने त्यांच्या तैलचित्राचा स्वीकार समारंभ नुकताच मालघर इथे पार पडला. रामभाऊ साठे यांनी कोकणातले हजारो विद्यार्थी घडवले. रामपूरच्या मिलिंद हायस्कूलचे ते मुख्याध्यापक होते. निवृत्तीनंतर त्यांनी स्वतःची सगळी पुंजी खर्च करून मालघरमध्ये गुरूकुल ही माध्यमिक शाळा उभारली. निवृत्तीनंतरही तीस वर्षं ते या शाळेत शिकवत होते. औपचारिक शिक्षणाच्या जोडीला शेतीची आवड निर्माण होण्यासाठी प्रोत्साहन देणं, जलसंवर्धनासाठी बंधारे बांधून घेणं, विचारमंच यांसारखे काळाच्या पुढचे उपक्रम त्यांनी राबवले. त्यांच्या जन्मशताब्दी वर्षातच संग्रहालय पूर्ण करण्याचा संस्थेचा प्रयत्न आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी अनिकेत कोनकर, रत्नागिरी.**

**बेस्ट बस अपघात-मुंबई**

मुंबईतील कुर्ला इथल्या बेस्ट बस अपघातातील मृतांची संख्या सात झाली असून जखमींची संख्या 49 झाली आहे. जखमींना उपचारासाठी मुंबईतील विविध रूग्णालयांमधे दाखल केलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या दुर्घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. तसंच, मृतांच्या वारसांना मुख्यमंत्री सहायता निधीतून पाच लाख रुपयांची आर्थिक मदत आणि जखमींच्या उपचाराचा खर्च मुंबई महापालिका आणि बेस्टच्या वतीनं करण्याचे आदेशही मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. दरम्यान, या बस चालकाला 21 डिसेंबरपर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली आहे.

**कृष्णा श्रद्धांजली**

माजी परराष्ट्र मंत्री आणि महाराष्ट्राचे माजी राज्यपाल एस. एम. कृष्णा यांच्या निधनाबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शोक व्यक्त केला आहे. कृष्णा यांच्या निधनामुळे देशानं राजकारणातलं एक सुसंस्कृत आणि अभिरुचीसंपन्न व्यक्तिमत्त्वं गमावलं असल्याची शोकभावना महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी व्यक्त केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार, यांच्यासह विविध नेत्यांनी एस एम कृष्णा यांना श्रद्धांजली वाहिली आहे. एस एम कृष्णा यांचं काल बंगळुरू इथं निधन झालं. ते 92 वर्षांचे होते.

**हवामान**

काल जळगाव इथं 8 तर नाशिक इथं 9 पूर्णांक 4 अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. आज राज्यात हवामान कोरडं राहील.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.